नियमिती दिवाणी दावा क्र.२२५/२०१०
निशान नंबर - १३२/सी सोबत.
सुरू झाल्याची वेळ ११:४५

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा शपथेवर सरतपास विद्वान विधीज्ञ श्री. बी.आर. पाटील यांचेमार्फत .</u>**

नाव:- गणपती जकाप्पा हुद्दार

व.व.६९, व्यवसाय:- सेवानिवृत्त

रा. गडहिंग्लज, कोल्हापूर.

सन २०१३ साली मी उपअधिक्षक भूमी अभिलेख, हातकणंगले येथे निमतानदार म्हणून कार्यरत होतो. आता मला नि.५५ सोबत अ.नं.१ वर दाखल गट नं.६५९ मध्ये झालेल्या कोर्ट कमिशनर मोजणीचा रिपोर्ट दाखवला. भूमी अभिलेख कार्यालयाने मला सदरच्या गट मोजणीकरिता आदेश दिले होते. सदरचे प्रकरण माझ्याकडे जून २०१३ मध्ये सोपवण्यात आले. त्यानंतर मी अभिलेखात उपलब्ध संबंधीत जमीनीची फाळणी नकाशे काढून घेतले. त्यानंतर मी वादी-प्रतिवादी यांना दि.०३/०६/२०१३ रोजी वादी व प्रतिवादी यांना मोजणीसाठी नोटीसा काढल्या. मोजणीची तारीख दि.२५/०६/२०१३ निश्चित करून रजि. पोस्टाने सदरच्या नोटीसा पाठवल्या. सदर नमूद मोजणीच्या तारखे दिवशी प्रत्यक्ष गावी व सदरच्या गट नंबर मध्ये गेलो. त्यावेळी वादी व प्रतिवादी सुभाष बंडू सुतार, पंच हजर होते. त्यानंतर वादी व प्रतिवादी यांनी दाखवलेल्या गटाच्या प्रत्यक्ष वहिवाटीला चुना घालून फलकयंत्रच्या साहाय्याने मोजणीचे काम केले. त्यानंतर मोजणी केलेबाबत वादीचा जबाब घेतला. प्रतिवादी याने जबाब देण्यास नकार दिला. त्याबाबत पंचनामा केलेला आहे. त्यानंतर मी अभिलेखातील मुळ नकाशा व जागेवर केलेल्या नकाशा प्रमाणे हद्दी निश्चित केल्या व वादी व प्रतिवादी यांची वहिवाट दाखवली, त्याप्रमाणे अंतिम नकाशा तयार करून कार्यालयाला सुपुर्त केला. अंतिम नकाशाप्रमाणे प्रतिवादी सुभाष बंडू सुतार यांचे प्रत्यक्ष वहिवाटीस ३ आर क्षेत्र जादा असल्याचे आढळून आले. वादी यांचे वहिवाटीचे क्षेत्र २०.५ आर इतके क्षेत्र असल्याचे आढळून आले. मोजणी पुर्ण झाल्यानंतर सदरचे प्रकरण मी कार्यालयात जमा केले. प्रकरण जमा केल्यानंतर कार्यालयाने दि.०२/०८/२०१३ रोजीच्या पत्राने न्यायालयास कळवले. सदरच्या पत्रासोबत कार्यालयाने संपुर्ण प्रकरण नकाशे, जाब-जबाब, इ. न्यायालयात पाठवून दिले. प्रकरण न्यायालयात पाठवून दिल्यानंतर कार्यालयामध्ये अंतिम नकाशाची अ व ब प्रत ठेवून घेतली जाते. सदरच्या अ व ब प्रती मी आज रोजी माझ्यासोबत आणलेल्या आहेत. नि.५५ वर दाखल कोर्ट कमिशनर रिपोर्ट मधील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरच्या रिपोर्ट सोबतची अन्य कागदपत्रे देखील खरी व बरोबर

आहेत. रिपोर्ट सोबत असलेल्या कागदपत्रांवर माझ्या निमतानदार म्हणून सह्या आहेत.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. व्ही. मुदगल यांचेमार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरू.</u>**

मी इयत्ता १० वी पास असून जमीन मोजणीचे माझे प्रशिक्षण झालेले आहे. मोजणीचे मॅन्युअल मी पाहिलेले आहे. प्रस्तुत कामामध्ये न्यायालयाने कोर्ट कमिशनरद्वारे मोजणीचा दिलेला नेमका आदेश काय होता हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयीन आदेशाप्रमाणे वादी व प्रतिवादीच्या हजेरीमध्ये गट मोजणी करण्याचे होते. माझी व वादी मोहन धर्मा कांबळे यांची ओळख नव्हती, मोजणीच्या वेळी ग्रामपंचायतीमध्ये झाली. प्रतिवादी सुभाष सुतार व माझी अगोदर ओळख नव्हती. मोजणीच्या दिवशी माझी व प्रतिवादी सुभाष सुतार यांची ओळख झाली. त्याआधी ओळख नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करण्यापूर्वी सर्व वादी प्रतिवादींना मोजणीच्या नोटीसा पोहोचणे बंधनकारक आहे. आता मला नि.५५ वरील दाखल कागदपत्रे दाखवले. वादी व प्रतिवादी यांना नोटीसा पोहोचल्याबाबतच्या पोहोच पावत्या आहेत. परंतु, सुभाष सुतार यांची नोटीस परत आलेली आहे, त्यांच्या नावची पोहोच पावती कामात नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना दि. २५/०७/२०१३ रोजीच्या मोजणीच्या पाठवलेल्या नोटीसांच्या पोहोच पावत्या प्रस्तुत कामात दाखल नाहीत.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना मोजणीची नोटीस पाठवल्यानंतर ती त्यांना मिळाली किंवा नाही याचा पंचनामा करण्याचा अधिकार मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीच्या वेळी वादी व प्रतिवादी हजर आहेत किंवा नाही याचा पंचनामा करण्याचा अधिकार मला नाही. मोजणीची नोटीस वादी-प्रतिवादींनी मोजणीच्या वेळी हजर रहावे म्हणून पाठवली जाते. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत कामामध्ये मी मोजणीच्या वेळी वादी प्रतिवादी हजर असलेबाबतचा पंचनामा केलेला नाही. आता मला नि.५५ वरील कागदपत्रे दाखवले. त्यामधील पान क्र.१३१ वरील पंचनाम्यामध्ये प्रतिवादी सुभाष सुतार गैरहजर असल्याचे मी लिहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीच्या वेळी हजर असलेल्या वादी प्रतिवादींची जबाबावर सही घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी सुभाष सुतार यांचा जबाब मी घेतला नाही. (साक्षीदार पुढे सांगतो की, त्यांनी जबाब देण्यास नकार दिल्याने मी त्यांचा जबाब घेतला नाही.) जबाब देण्यास नकार दिल्यानंतर मॅन्युअलमध्ये पंचनामा करण्याची तरतूद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीच्या ठिकाणी प्रतिवादी सुभाष सुतार हजर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीशी संगणमत करून फसवून

प्रतिवादी मोजणीच्या वेळी हजर असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींच्या गैरहजेरीत त्यांना नोटीस न बजावता केलेली मोजणी चुकीची आहे.

मी गट नं.६५९ चा ७/१२ उतारा पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची जमीन शासकीय उता-याप्रमाणे सामाईकात आहे. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय उतारा प्रमाणभूत मानुण मोजणी केली जाते. सदरच्या ७/१२ उता-यामध्ये वादी व प्रतिवादींची नावे सामाईक म्हणून नमूद आहेत. मी गट नं.६५९ चा नकाशा पाहिलेला आहे. त्याचा फाळणी नकाशा नि.५५ वरील कागदपत्रांमध्ये आहे. सदरच्या नकाशाप्रमाणे गट नं.६५९ चे क्षेत्र ४७ आर इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या फाळणी नकाशामध्ये गट नं.६५९ मध्ये फाळणी झाल्याची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, फाळणी नकाशामधील फाळणी झाल्याच्या नोंदी अंतिम असतात. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.६५९ मध्ये फाळणी झाली नसल्याने त्यातील ४७ आर क्षेत्राच्या हद्दी फाळणी नकाशावरून सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय कागदपत्रे, नोंदी, नकाशे यामध्ये वादी व प्रतिवादी यांच्या हद्दी दाखवलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाने मला वाटप करून हद्दी निश्चित करण्याबाबत आदेशीत केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने सांगितल्याप्रमाणे मी चुना टाकून हद्दी निश्चित केल्या. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाचा हूकुमनामा (Decree) झाल्यानंतर मला हद्दी निश्चित करण्याचा अधिकार आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत कामामध्ये तसा हूकुमनामा झालेला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मोजणीसाठी शेतात गेल्यानंतर शेतातील पिकाची अवस्था, इलेक्ट्रीक पोल, बांध, इ. ची नोंदी केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, शेतामध्ये जर ऊसाचे उभे पीक असेल तर जमीनीची मोजणी करता येत नाही.

वादीने आमच्याकडे पोलीस संरक्षणाचे मागणी केली होती किंवा कसे हे मला माहीत नाही. प्रस्तुत कामातील गट नं.६५९ ची माझ्या अगोदर मोजणी झाली होती किंवा कसे हे मला माहीत नाही. गट नं.६५९ च्या मोजणीच्या वेळी ऊसाची जमीन होती किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. मोजणीच्या अगोदर सदरच्या गटामध्ये कोणते पीक होते, जमीन जिरायत होती किंवा कसे याची चौकशी केली नव्हती. मोजणीच्या आधी सदरच्या जमीनीमध्ये ऊसाचे खोडवा पीक होते किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. आता मला नि.५५ वरील दाखल कागदपत्रे दाखवली. त्यामध्ये पान क्र.५ हा कागद माझा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे कागदपत्र मोजणीच्या कागदपत्रातील कागदपत्र आहे. पान क्र.५ वरील कागदपत्रामध्ये ऊसाचे उंच पीक असल्याने जमीनीची मोजणी करता आली

नाही असा माझ्या अगोदरच्या निमतानदार यांनी कार्यालयाला दिलेला रिपोर्ट आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रिपोर्ट नियमाप्रमाणे दिलेला आहे.

प्रश्न- मोजणी करतेवेळी जमीनीमध्ये कोणते पीक आहे, खोडवा किती आहे, इ. पाहून तसा पंचनामा करणे अत्यावश्यक आहे?

उत्तर- त्याची गरज नाही.

नि.५५ वरील दाखल कागदपत्रातील पान क्र.१०५ वर माझ्या अगोदरच्या निमतानदाराची सही आहे. पान क्र.१०५ वरील पंचनाम्याबाबत मी काहिही सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फाळणी नकाशामध्ये वादीचे क्षेत्र नमूद केले नसल्याने वादीच्या हद्दी निश्चितपणे सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सांगत असलेल्या हद्दींना कोणत्याही शासकीय कागदपत्रांचा, नोंदी किंवा नकाशांचा आधार नाही. मला भूमि अभिलेख खात्याने प्रस्तुत कामातील जमीनीची मोजणी करण्याचा आदेश प्रस्तुत कामात दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.५५ वरील कागदपत्रांमध्ये माझ्या अगोदर असलेल्या निमतानदारांचे आदेश आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावे खात्याने आदेश दिलेला नसताना मी मोजणी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, तसा आदेश असल्याशिवाय नियमाप्रमाणे मोजणी करता येत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, नि.५५ वरील कागदपत्रातील पान क्र.१३५ वरील नकाशामध्ये जो क्षेत्रांचा हिशोब दाखवलेला आहे तो मी माझ्या मनाप्रमाणे दाखवलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या क्षेत्रांच्या हिशोबासाठी कोणत्याही शासकीय कागदपत्रांचा आधार नाही.

मोजणी करताना जातेवेळी खात्यातुन आम्हाला फलक यंत्र, कंपास, पेन्सील, इ. दिलेले आहे. मी टेप, झेंडे, चिमटे, अभिलेखातील जमीनीचा मुळ नकाशा, इ. घेवून गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, खात्याकडून दिल्या जाणा-या साहित्याची नोंद खात्यामध्ये असते. वर नमूद खात्यातून आम्हाला दिलेल्या साहित्याशिवाय इतर साहित्याची खात्यामध्ये नोंद असल्याचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, खात्याने मला दिलेल्या साहित्याची कंपास, पेन्सील, टेप, झेंडे व चिमटे इत्यादीची नोंद माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करतेवेळी खात्याने मला offset, chainmen व pickman दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, हददी दाखविण्यासाठी झेंडेवाले खात्यामार्फत दिले जातात. झेंडेवाले म्हणुन माणसे आम्ही पक्षकारांकडुनच घेतो. हददी दाखविण्यासाठी किती लोक जमा झाले होते याचा निश्चित आकडा मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ते लोक मी गोळा केलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीकरीता मदतीसाठी जे लोक घेण्यात येतात त्यांना नियमाप्रमाणे खात्यामार्फत मोबदला देण्याची तरतुद आहे.

हे म्हणणे खरे आहे की, मदतीसाठी जी लोक घेतली होती त्यांना मोबदला दिल्याची नोंद नि. ५५ वरील रिपोर्टमध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीसाठी हददीची लाईन निश्चित करावी लागते. हे म्हणणे खरे नाही की, तशी लाईन मी मोजणीच्या कामी निश्चित केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तशी लाईन शासकिय नकाशा, नोंदी इत्यादी मध्ये नमुद नसल्याने मी तशी लाईन मोजणीच्या कामी निश्चित केलेली नाही.

मी कोणत्याही जमिनीत मोजणीसाठी गेल्यास जमिनीचे बांध पहात असतो. हे म्हणणे खरे आहे की, बांध, इलेक्ट्रीक पोल हे हददी निश्चित करण्यासाठी बेसलाईन असतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत कामी मी बांध निश्चित केल्याची नोंद केलेली नाही. आता मला नि. ५५ वरील दाखल कागदपत्रातील पान क्र. १३५ वरील नकाशा दाखवला. त्यामध्ये गट नं. ६५९ मधील बांधाची नोंद दाखवलेली नाही. नकाशामध्ये बांध दाखविण्याची मला गरज वाटली नाही म्हणुन तसे दाखवलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या नकाशामध्ये दाखवलेली पुर्व-पश्चिम रेखा बांधावरुन मारलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या नकाशावरुन बांध व हददीची पडताळणी करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या नकाशातील पुर्व - पश्चिम रेखेपासुन उत्तरेकडे एक फुट अंतरावर बांध आहे. तसा बांध असल्याचे म्हटल्यास नकाशावरुन पडताळणी करता येत नाही. न्यायालयाकडुन मोजणीचा आदेश आल्यानंतर सदरच्या आदेशाला स्थगिती आहे किंवा कसे याची पडताळणी मी केली होती. प्रस्तुत कामातील गट नं. ६५९ चा जुना रि.स. नं. १४५ होता, त्याचे क्षेत्र मी सांगु शकत नाही. रि.स.नं. १४६ चे क्षेत्र मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ६५९ चा फाळणीचा पेनने लिहलेला नकाशा मी प्रस्तुत कामात दाखल केलेला नाही. आता मला नि. ५५ वरील पान नं. १३३ वरील कागदपत्रे दाखवली. त्यामध्ये 'गट नं. ६५९' असे पेनने लिहलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या कागदपत्रावर 'गट नं. ६५९' असे मी पेन्सीलने लिहलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्याप्रमाणे व सुचनेप्रमाणे परस्पर मोजणी केलेली आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

साक्षीदाराचा जबाब माझ्या समक्ष नोंदवण्यात आला.        श्रवणोत्तर स्वीकत,
सही/-

दिनांक : ०९/०२/२०२६.
ठिकाण : इचलकरंजी.
०१.३० वा. पुर्ण.

**(एम.एस.गावडे)**
**५ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, इचलकरंजी.**